## L. A. BILL No. III OF 2023.

A BILL

TO AMEND THE DR. BABASAHEB AMBEDKAR TECHNOLOGICAL UNIVERSITY ACT, 2014 AND THE MAHARASHTRA COEP TECHNOLOGICAL UNIVERSITY ACT, 2022.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ या अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

२०१४ चा १० महा. २९. २०२२ चा महा. ३५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ या अधिनियमांमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

एचबी २६६०-१

## प्रकरण एक

## प्रारंभिक.

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

## प्रकरण दोन

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ याची सुधारणा.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम १३ ची सुधारणा.

२०१४ चा महा. २९.

**२.** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ याच्या कलम १३ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील,—

(क) खंड (क) मध्ये,—

(एक) " एक समिती " या मजकुराऐवजी, " एक शोध-नि-निवड समिती " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (एक) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

" (एक) कुलपतीने नामनिर्देशित केलेला सदस्य, जो उच्च शिक्षण क्षेत्रातील विख्यात व्यक्ती असेल आणि जो एकतर, शिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय ख्यातीची विख्यात विद्वान व्यक्ती किंवा पद्म पुरस्कारप्राप्त व्यक्ती असेल ;" ;

(तीन) उप-खंड (तीन) नंतर, पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (चार) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षाने नामनिर्देशित केलेला सदस्य ;" ;

(ख) खंड (ग) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (ग) समितीवर नामनिर्देशित केलेले सदस्य, अशा व्यक्ती असतील की ज्या, विद्यापीठाशी किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही महाविद्यालयाशी किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त परिसंस्थेशी कोणत्याही रीतीने संबंधित असणार नाहीत ;" ;

(ग) खंड (घ) मधील, " तीन " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(२) पोट-कलम (४) मधील,—

(क) खंड (ख) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :—

" (ख) उच्चस्तरीय क्षमता, सचोटी, नैतिकता व संस्थात्मक बांधिलकी असलेली व्यक्ती असेल ; आणि कोणत्याही विद्यापीठात प्राध्यापक म्हणून किमान दहा वर्षांचा अनुभव असलेला किंवा शैक्षणिक नेतृत्त्व सिद्ध केल्याच्या पुराव्यासह लौकिकप्राप्त संशोधन किंवा शैक्षणिक प्रशासकीय संघटनेतील दहा वर्षांचा अनुभव असलेला विख्यात शिक्षणतज्ज्ञ असेल ;" ;

(ख) खंड (ङ) मधील, " शैक्षणिक अर्हता " या मजकुराऐवजी, " अतिरिक्त शैक्षणिक अर्हता " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (६) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (६क) जर कुलपतीने निवड केलेली व्यक्ती, कुलगुरू पदाचा कार्यभार स्वीकारीत नसेल तर, कुलपतीस, नामिकेतील उर्वरित व्यक्तींमधून अन्य सुयोग्य व्यक्तीची निवड करता येईल किंवा त्यास, एकतर त्याच समितीकडून किंवा या प्रयोजनासाठी नवीन समिती घटित केल्यानंतर, अशा नवीन समितीकडून, नवीन नामिकेची मागणी करता येईल .".

## प्रकरण तीन

## **महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ याची सुधारणा.**

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ११ ची सुधारणा.

२०२२ चा महा. ३५.

**४.** महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ याच्या कलम ११ मध्ये,—

(१) पोट-कलम (३) मधील,—

(क) खंड (क) मध्ये,—

(एक) उप-खंड (एक) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

" (एक) कुलपतीने नामनिर्देशित केलेला सदस्य, जो उच्च शिक्षण क्षेत्रातील विख्यात व्यक्ती असेल आणि जो एकतर, शिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय ख्यातीची विख्यात विद्वान व्यक्ती किंवा पद्म पुरस्कार प्राप्त व्यक्ती असेल ;";

(दोन) उप-खंड (तीन) नंतर, पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (चार) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षाने नामनिर्देशित केलेला सदस्य ; " ;

(ख) खंड (ग) मधील, " तीन " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ग) खंड (घ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (घ) समितीवर नामनिर्देशित केलेले सदस्य, अशा व्यक्ती असतील की ज्या, विद्यापीठाशी किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही महाविद्यालयाशी किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त परिसंस्थेशी कोणत्याही रीतीने संबंधित असणार नाहीत ; " ;

(घ) खंड (च) मध्ये,—

(एक) उप-खंड (एक) पूर्वी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (एक-१) उच्चस्तरीय क्षमता, सचोटी, नैतिकता व संस्थात्मक बांधिलकी असलेली व्यक्ती असेल ;";

(दोन) उप-खंड (चार) मध्ये,—

(१) " शैक्षणिक अर्हता " या मजकुराऐवजी, " अतिरिक्त शैक्षणिक अर्हता " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) परंतुकामधील, " शैक्षणिक अर्हता " या मजकुराऐवजी, " अतिरिक्त शैक्षणिक अर्हता " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (४) मधील,—

(क) विद्यमान परंतुकापूर्वी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, जर कुलपतीने निवड केलेली व्यक्ती, कुलगुरू पदाचा कार्यभार स्वीकारीत नसेल तर, कुलपतीस, नामिकेतील उर्वरित व्यक्तींमधून अन्य सुयोग्य व्यक्तीची निवड करता येईल किंवा त्यास, एकतर त्याच समितीकडून किंवा या प्रयोजनासाठी नवीन समिती घटित केल्यानंतर, अशा नवीन समितीकडून, नवीन नामिकेची मागणी करता येईल : " ;

(ख) विद्यमान परंतुकामधील, " परंतु " या मजकुराऐवजी, " परंतु आणखी असे की, " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ (२०१४ चा महा. २९) याचे कलम १३ व महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ (२०२२ चा महा. ३५) याचे कलम ११ यांमध्ये कुलगुरूची नियुक्ती करण्यासाठी पात्रता निकषांची व निवड समिती घटित करण्याची तरतूद केली आहे.

२. कुलगुरूची नियुक्ती करण्यासाठी पात्रता निकषांच्या व निवड समिती घटित करण्याच्या तरतुदींमध्ये, विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ (१९५६ चा ३) अन्वये तयार केलेल्या विद्यापीठ अनुदान आयोग (विद्यापीठांमधील व महाविद्यालयांमधील अध्यापकांच्या व इतर विद्याविषयक कर्मचारीवर्गाच्या नियुक्तीच्या किमान अर्हता आणि उच्च शिक्षणातील मानके राखण्याच्या इतर उपाययोजना) विनियम, २०१८ याद्वारे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून फेरबदल करण्यात आले आहेत.

३. सर्वोच्च न्यायालयाने, गंभीरदान के. गढवी- विरुद्ध- गुजरात राज्य व इतर [रिट याचिका (दिवाणी) क्रमांक २०१९ चा १५२५] आणि प्राध्यापक डॉ. श्रीजीत पी. एस.-विरुद्ध- डॉ. राजश्री एम. एस. व इतर (दिवाणी अपील क्रमांक २०२२ चा ७६३४-७६३५) या प्रकरणांमध्ये असा निर्णय दिलेला आहे की, कुलगुरूचे पात्रता निकष व नियुक्ती, नेहमीच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संबंधित विनियमांनुसार असेल आणि जर राज्य अधिनियम, विद्यापीठ अनुदान आयोग विनियमांशी अनुरूप नसतील तर, ते, लागू असलेल्या विद्यापीठ अनुदान आयोग विनियमांशी अनुरूप करण्यासाठी त्यात सुधारणा केली पाहिजे आणि त्यात सुधारणा करण्यात येईपर्यंत, लागू असलेले विद्यापीठ अनुदान आयोग विनियम, अधिभावी असतील.

४. वरील वस्तुस्थिती विचारात घेता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ व महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ यांमध्ये अंतर्भूत असलेल्या कुलगुरूची नियुक्ती करण्याशी संबंधित, अस्तित्त्वात असणाऱ्या तरतुदी, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनियमांशी सुसंगत करण्यासाठी त्यांमध्ये यथोचित सुधारणा करण्याची गरज आहे.

५. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २६ फेब्रुवारी, २०२३.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

**सन २०२३ चे वि.स. विधेयक क्रमांक ३–डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ व महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.**

**(डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ यातील उतारे.)**

**(सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९)**

**१.** ते **१२.** ** ** ** **

**१३.** (१) कुलपती, हा कुलगरूची पुढील पद्धतीने नियुक्ती करील :— कुलगुरू.

(क) कुलगुरूच्या नियुक्तीसाठी कुलपतींना योग्य अशा नावांची शिफारस करण्याकरिता पुढील सदस्यांचा समावेश असलेली एक समिती असेल :—

(एक) कुलपतीने नामनिर्देशित केलेला सदस्य, जो सर्वोच्च न्यायालयाचा निवृत्त न्यायाधीश असेल किंवा उच्च न्यायालयाचा निवृत्त मुख्य न्यायमूर्ती असेल अथवा राष्ट्रीय ख्यातीचा विख्यात संशोधक असेल वा त्याला शिक्षण क्षेत्रातील पद्म पुरस्कार मिळाला असेल ;

(दोन) व (तीन) ** ** **

(ख) ** ** **

(ग) नामनिर्देशित केलेले सदस्य हे विद्यापीठ संबंधित नसलेल्या व्यक्ती असतील ;

(घ) समितीचे सर्व तीन सदस्य उपस्थित असल्याखेरीज समितीची कोणतीही बैठक घेतली जाणार नाही.

(२) व (३) ** ** ** **

(४) कुलगुरू म्हणून नियुक्तीसाठी समितीसाठी समितीद्वारे शिफारस केलेली व्यक्ती,—

(क) ** ** ** **

(ख) प्रख्यात विद्वान असेल किंवा उच्च दर्जाचा प्रशासक असेल ;

(ग) व (घ) ** ** ** **

(ङ) राज्य शासनाने, कुलपतीशी विचारविनिमय करून, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केलेली अशी शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणारी असेल.

(५) व (१३) ** ** ** **

**१४.** ते **१११.** ** ** ** **

**अनुसूची.** ** ** ** **

**(महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ यातील उतारे.)**

**(सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५)**

**१.** ते **१०.** ** ** ** **

कुलगुरू व त्याची नियुक्ती.

**११.** (१) व (२) ** ** ** **

(३) यात याखील नमूद केलेल्या रीतीने, कुलपतीकडून, कुलगुरूची नियुक्ती करण्यात येईल :—

(क) कुलगुरूच्या नियुक्तीसाठी कुलपतीला सुयोग्य नावांची शिफारस करण्याकरिता पुढील सदस्यांचा समावेश असलेली एक शोध-नि-निवड समिती असेल :—

(एक) कुलपतीने नामनिर्देशित केलेला एक सदस्य असेल, जो सर्वोच्च न्यायालयाचा सेवानिवृत्त न्यायाधीश किवा उच्च न्यायालयाचा सेवानिवृत्त मुख्य न्यायमूर्ती असेल ;

(दोन) व (तीन) ** ** **

(ख) ** ** ** **

(ग) समितीचे सर्व तीन सदस्य उपस्थित असल्याशिवाय समितीची कोणतीही बैठक घेण्यात येणार नाही ;

(घ) समितीवर नामनिर्देशित केलेले सदस्य, विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या व्यक्ती असतील.

(ङ) ** ** ** **

(च) कुलगुरू म्हणून नियुक्तीकरिता, समितीने शिफारस केलेली व्यक्ती,—

(एक) ते (तीन) ** ** **

(चार) कुलपतीशी विचारविनिमय करून राज्य शासनाद्वारे **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रामधील शैक्षणिक अर्हता व अनुभव तिने धारण केलेला असेल :

परंतु अशी शैक्षणिक अर्हता व अनुभव, विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा, यथास्थिति, इतर कोणत्याही नियामक प्राधिकरणाने विहीत केलेल्या निकषांशी सुसंगत असेल.

(छ) ** ** ** **

(४) कुलपतीस, समितीने शिफारस केलेल्या नामिकेमध्ये समाविष्ट असलेल्या व्यक्तींपैकी एका व्यक्तीची, कुलगुरू म्हणून नियुक्ती करता येईल :

परंतु, जर कुलपतीने, अशी शिफारस केलेल्या कोणत्याही व्यक्तीस मान्यता दिली नाही तर, त्यास, त्याच समितीकडून किंवा या प्रयोजनासाठी नवीन समिती घटीत केल्यानंतर अशा नवीन समितीकडून नवीन नामिका मागवता येईल.

(५) ते (१४) ** ** ** **

**१२.** ते **८८.** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३.]**

**[ डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ या अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.**]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई